# ठाणे महानगरपालिका, ठाणे

शहर विकास विभाग,
सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची सेवा करार पध्दतीने
विवक्षित कामांसाठी घेणेकरीता कंत्राटी जाहिरात.

वाचा :- शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/दिनांक १७ डिसेंबर २०१६.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात MMRDA/MSRDC/CIDCO/MSEB/रेल्वे/मेट्रो/ब्रिज व रस्ते अशी विविध शासकीय/निमशासकीय कामे सुरु असुन सदरची कामे करत असतांना शासन व इतर शासकिय विभागांशी वांरवांर संबध येत असतो, सदरची कामे करतांना शासन व स्थानिक संस्था यांच्या समन्वय साधने आवश्यक असते तसेच सदर कामात सुसूत्रता व गतीमान होण्याच्या दृष्टीने शासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांचे कामकाजाबाबत सखोल अनुभव असणारे अनुभवी वर्ग-१ मधील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नेमणुक होणे आवश्यक असल्याने, खालील पदांची जाहिरात सहा महिन्याच्या कालावधीकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/दिनांक १७ डिसेंबर २०१६ अन्वये शासकीय/निमशासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडुन अर्ज ठाणे महानगरपालिका, ठाणे, आस्थापना विभाग, प्रशासकीय भवन, पहिला मजला, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे यांचेकडे दि.२८/०३/२०२२ ते दि.०६/०४/२०२२ या कालावधीत मागविण्यात येत आहेत. अर्जाच्या लिफाफयावर करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी अर्ज असे ठळक अक्षरांत नमूद करावे. अर्जासोबत स्वत:चा पत्ता असलेला व त्यावर रु.५/- चे पोस्ट मुंद्राक चिकटवलेल्या १५ सें.मी x १० सें.मी. आकाराचा लिफाफा पाठविण्यात यावा. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

| अ.क्र | पदनाम | वयोमर्यादा | मासिक पारिश्रमिक | एकुण जागा | पात्रतेचा निकष |
|---|---|---|---|---|---|
| १. | ठाणे महानगरपालिका क्षेत्रात MMRDA/MSRDC/ CIDCO/SEB/ रेल्वे/मेट्रो/ब्रिज व रस्ते अशा विविध कामावर नियत्रंण ठेवण्याकरीता " समन्वयक " | किमान - ५८ वर्ष व कमाल - ६५ वर्ष | शासन निर्णय क्र. संक्रिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७ डिसेंबर, २०१६ अन्वये देय मासिक पारिश्रमिक (शासन निर्णयातील ड (१) (क) च्या अनुषंगाने) | ०१ | १.मान्यता प्राप्त विद्यापिटाची पदवी.<br>२.शासकीय/निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था येथे वर्ग - १ चे पदावर प्रशासकीय कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. |

सदरची पदे निव्वळ सहा महिन्याच्या कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणार असून पदाचा कार्यकाळ सहा महिन्याचा असेल, आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्यात येईल. उक्त पदाचे मासिक परिश्रमिक हे शासन निर्णयामध्ये नमुद परिशिष्ट-अ नुसार अदा करण्यात येईल. तसेच उक्त शासन निर्णयानुसार इच्छुक उमेदवाराची कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी. उमेदवारांनी संदर्भिय शासन निर्णयानुसार अर्ज संपूर्ण माहिती बायोडाटासह/फोटो व आवश्यक शैक्षणिक प्रमाणपत्र व सेवानिवृत्त आदेशासह (संबंधित कोषागार कार्यालयाचा दाखला व सेवा निवृत्ती पुर्व घेतलेल्या वेतनाचा संबंधित कार्यालयाचा दाखला) अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

ठामपा/पिआरओ/आस्था/१९५१/२०२१-२२
दि.२६.०३.२०२२

सही/-
(संजय हेरवाडे)
अतिरिक्त आयुक्त-२
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

***Please visit our official website***
***www.thanecity.gov.in***

संरक्षित रहा, कोरोना विषाणूपासून सुरक्षित रहा !

Protected with trial vers... ...on doesn't put this mark.